मुलाखत

सूर्यकांत नेटके

# शेती शाश्वत करण्यावर भर देणार

महागडी खते वापरूनही पिकांची उत्पादकता वाढत नाही, ही वस्तुस्थिती आहे. पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी जमीन आरोग्य संवर्धन आणि नावीन्यपूर्ण आधुनिक तंत्रज्ञान वापरून शेती शाश्वत करण्यावर भर द्यावा लागणार आहे. विद्यापीठाच्या कार्यक्रमात हवामान बदलाला तोंड देण्यासाठी विशेष संशोधन महत्त्वाचे ठरणार आहे. तसेच नैसर्गिक शेती पद्धतीला शास्त्रीय आधार देण्याची गरज आहे. या संदर्भात महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू **डॉ. विलास खर्चे** यांच्याशी साधलेला संवाद.

### आपल्याला कुलगुरुपदाची संधी मिळाली. यापूर्वीही आपण या विद्यापीठात काम केले आहे, त्याबद्दल काय सांगाल?

मी महात्मा फुले कृषी विद्यापीठात साधारण नऊ वर्षे काम केलं. माझा येथील कामाचा अनुभव खूप चांगला आहे. तीस वर्षांपेक्षा अधिक काळ वेगवेगळ्या विद्यापीठांत संशोधन संचालक आणि अन्य पदांवर काम केलं. क्षारयुक्त जमीन संशोधन, शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञान निर्मिती आदी बाबींवर भर दिला. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून राज्यातील शेतकऱ्यांसाठी पुन्हा एकदा काम करण्याची संधी दिलीय. या विद्यापीठाने अनेक महत्त्वाच्या बाबींवर आतापर्यंत काम केलंय, विविध उपक्रम राबवले आहेत. शेतकऱ्यांचं विद्यापीठावर प्रेम आहे. आतापर्यंतचे उपक्रम अधिक जोमात आम्ही पुढे चालविणार आहोत. शेतकऱ्यांचा विश्वास अधिक दृढ करणार आहोत.

### पुढील काळात कोणत्या बाबींना प्राधान्य असेल?

कृषी विद्यापीठाचे संशोधन, शिक्षण व विस्तार शिक्षण हे प्रमुख अंग आहेत. यात विद्यापीठासमोर अनेक आव्हाने आहेत. त्यावर मात करून शेतकऱ्यांना नवा विश्वास द्यावा लागणार आहे. प्रामुख्याने एक बाब दिसतेय, की जमिनीचं आरोग्य खालावलं आहे, त्यामुळे पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी शेतकरी महागडी खतं वापरत आहेत. परंतु तरीही उत्पादकता मिळत नाही. त्यामुळे यापुढे पिकांची उत्पादकता वाढवण्यासाठी जमिनीच्या आरोग्याचे संवर्धन आणि नावीन्यपूर्ण आधुनिक तंत्रज्ञान, त्यात प्रामुख्याने कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, नॅनो टेक्नॉलॉजी इत्यादींचा वापर करून शेती शाश्वत करण्यावर माझा भर असेल. केंद्र सरकार पीक उत्पादन वाढ, शेती विकासासाठी ज्या प्रमुख योजना राबवत आहे, त्या योजना विद्यापीठाच्या संशोधनाला धरून असाव्यात असं माझं मत आहे. त्याच दृष्टीने पुढील काळात काम करताना विद्यापीठांतर्गत दहा जिल्ह्यांतील कृषी हवामान, जमीन, पिके, संसाधने यांचा विचार करून संशोधनाचा कार्यक्रम ठरवला जाईल.

### संशोधनासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्यासाठी काय उपाययोजना करणार?

कृषी संशोधनासाठी निधी कमी पडतो, ही बाब खरी आहे. शासनाकडून पूर्वी १० टक्के अनुदान मिळत होते; आता केवळ तीन टक्केच अनुदान मिळते. शेवटी शेतकरी विकासासाठी नवनवीन संशोधन होणे गरजेचे आहे. त्यामुळे आता आम्ही बाह्य संस्थांद्वारे निधी मिळवून संशोधनाला बळकटी देणार आहोत. यात प्रामुख्याने मुंबईतील राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशन, अणुशास्त्र प्रौद्योगिकी आणि अणुऊर्जा संशोधन संस्था, शासनाची राष्ट्रीय कृषी विकास योजना, जिल्हा नियोजन समिती, नवी दिल्लीतील भारतीय कृषी संशोधन परिषद आणि कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय यांच्याशी समन्वय साधणार आहे. कृषी विद्यापीठात जागतिक दर्जाचे संशोधन होण्यासाठी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित संस्थांसोबत सामंजस्य करार करण्याचा माझा प्रयत्न असेल. शेतकऱ्यांसोबत समन्वय ही बाब महत्त्वाची आहे. शेतकरी-शास्त्रज्ञ मंच हा उपक्रम बळकट करून अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचवण्यावर भर असेल.



डॉ. विलास खर्चे

### हवामान बदलाबाबत संशोधनाच्या आघाडीवर काय करणार आहात?

हवामान बदलाचे संकट गंभीर आहे. त्याचा शेतीवर विपरीत परिणाम होत आहे. सर्वच भागांतील शेतीला सातत्याने फटका बसत आहे. यासंदर्भात हवामान अनुकूल वाण आणि तंत्रज्ञान निर्मिती करण्याला विद्यापीठाचे प्राधान्य असेल. मुळात आता बदलत्या हवामानाला तोंड देत शेतकऱ्यांना चांगले उत्पादन कसे घेता येईल, अशा स्वरूपाच्या संशोधनाची गरज आहे. शेतकऱ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रामुख्याने गारपीट, अतिवृष्टी, दुष्काळ, पूरपरिस्थिती यामुळे शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. अशा वेळी नवे संशोधन, उपाययोजना देण्याची जबाबदारी कृषी विद्यापीठाची आहे. विद्यापीठाच्या संशोधन कार्यक्रमात हवामान बदलाला तोंड देण्यासाठी करावयाच्या संशोधनावर मुख्य फोकस असेल.

### विद्यापीठातील रिक्त जागांबाबत काय नियोजन केले आहे?

रिक्त जागांमुळे उपलब्ध कर्मचाऱ्यावर कामाचा ताण येतो. सध्या विद्यापीठामध्ये ५५ ते ६० टक्के जागा रिक्त आहेत. एवढ्या जागांवर काम करायला माणसं नसतील, तर अडचणी येणारच. त्यामुळे विद्यापीठात पारदर्शकपणे काम करताना वेगवेगळ्या रिक्त जागा भराव्यात यासाठी मी सर्वप्रथम आग्रही असेल. विद्यापीठाचा आकृतिबंध आता अंतिम टप्प्यात आहे. हा आकृतिबंध मंजूर झाल्यानंतर लवकरच पदभरती करण्यात येईल. त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे.

### नैसर्गिक शेतीच्या अनुषंगाने आपली काय भूमिका आहे?

बदलत्या जीवनशैलीमुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे आता नैसर्गिक शेतीच्या उत्पादनांची मागणी वाढत आहे. नैसर्गिक शेती पद्धतीवर सखोल संशोधन करून या संकल्पनेला शास्त्रीय आधार देण्यासाठी अभियान स्वरूपात आम्ही काम करणार आहोत. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात नैसर्गिक शेतीचे मोठ्या प्रमाणावर प्रयोग घेतले जातील. येत्या काळात नैसर्गिक शेती तंत्रज्ञानाच्या शिफारशी आम्ही देऊ.

### विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना संशोधन करण्यासाठी काही धोरण आहे का?

निश्चितच, या संकल्पनेचा प्रारंभीच विचार केला आहे. कृषी विद्यापीठामध्ये शास्त्रज्ञांबरोबर पदव्युत्तर शिक्षण घेणारे व संशोधन कार्य करणारे विद्यार्थी कार्यरत आहेत. शेतीत सध्या सर्वाधिक गंभीर समस्या मजुरांची आहे. शेतकऱ्यांच्या ज्वलंत समस्या, बाजारपेठेत काय हवे आहे याचा अभ्यास करून त्यावर विद्यार्थ्यांना संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

### कृषी पदवीधर उद्योजक व्हावेत, असे नेहमी म्हटले जाते. त्यासाठी काही संकल्पना आहेत का?

विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मी पुढाकार घेणार आहे. येथे शिकलेले अनेक विद्यार्थी उद्योजक झालेले आहेत; पण त्यात अधिक भर पडावी, असा आमचा प्रयत्न राहील. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेचा विकास होण्यासाठी, विद्यार्थी व ग्रामीण युवकांना स्टार्टअप आणि इतर बाबींचे मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठामध्ये लवकरच इन्क्युबेशन इंटरप्रिनरशिप डेव्हलपमेंट सेंटर (IEDC) सुरू करण्याची माझी संकल्पना आहे. या केंद्रामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, उद्यमशीलतेला वाव दिला जाईल. त्यांच्या उद्योजकतेच्या संकल्पना येथे पूर्णत्वास जाव्यात, यासाठी कृषी विद्यापीठ प्रयत्न करणार आहे.

### शेतकऱ्यांना विद्यापीठाचे बियाणे वेळेवर आणि मागणीनुसार मिळण्यासाठी काय उपाययोजना करणार आहात?

विद्यापीठाने वेगवेगळ्या पिकांचे विविध वाण विकसित केले आहेत. त्या वाणांतून चांगले उत्पादन निघत असल्याने त्यांच्या बियाण्यांना मागणीही चांगली असते. मात्र बियाणे उत्पादन पुरेसे होत नाही, असं शेतकऱ्यांचं म्हणणं आहे. विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर खरीप व रब्बी हंगामात वेगवेगळ्या पिकांचे बीजोत्पादन घेतले जाते. याशिवाय बीजोत्पादनासाठी विद्यापीठाने विविध शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट, खासगी कंपन्यांसोबत मूलभूत बियाणे पुरवठ्यासाठी एकूण २६९८ सामंजस्य करार केलेले आहेत. त्यामुळे बियाणे साखळी अधिक सक्षम होत असून, प्रत्येक शेतकऱ्याला उत्कृष्ट प्रतीचे बियाणे उपलब्ध होण्यास मदत होत आहे. त्यात अजून अधिक बीजोत्पादन कसे वाढेल यावर मी स्वतः लक्ष घालणार आहे. बियाणे उत्पादनासाठी करार करण्याच्या प्रक्रियेला गती देण्यात येत आहे; जेणेकरून शेतकऱ्यांना अधिकाधिक दर्जेदार बियाणे उपलब्ध होतील.